**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, वाशिम यांचेकडून प्राप्त झालेल्या वाशिम जिल्हयातील ०२ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत दि. २४.१२.२०२४ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे दुपारी १२.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---------------

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम यांचेकडून वाशिम जिल्हयातील ०२ रेतीघाटांचे प्रस्ताव, पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. २४.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, आघात मुल्यांकन विभाग, नवी दिल्ली यांचे दि. ०९ जुन २०२१ रोजीचे ऑफिस मेमोरेन्डम मधील तरतुदी नुसार घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ अमरावती यांनी आदेश क्र. E-171 of 2024 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-241126-FTS-0054 दि. २६.११.२०२४ अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थितीत होते.

१. मा. श्री राजेंद्र जाधव, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, वाशिम — अध्यक्ष
२. श्री. सं. दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती — सदस्य
३. श्री सुशिलकुमार राठोड, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती-२— समन्वयक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. २२.११.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. २४.१२.२०२४ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी मा. श्री राजेंद्र जाधव यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम लोकसुनावणी समितीचे समन्वयक श्री सुशिलकुमार राठोड, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती-२ यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

वाशिम जिल्हयातील ०२ रेतीघाटांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी वाशिम यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, तळमजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स नागपूर.
२. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
३. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईट, २रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमासमोर, सायन सर्कलजवळ, (पु.) मुंबई-४०००२२.
४. प्रादेशिक कार्यालय/उपप्रादेशिक कार्यालय, अमरावती, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी विवेकानंद कॉलनीजवळ, बापटवाडी, अमरावती-४४४६०६.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम, जिल्हा परिषद, वाशिम, जिल्हा उद्योग केंद्र, वाशिम.
६. उप-विभागीय कार्यालय — वाशिम.
७. तहसिल कार्यालय - रिसोड, जि. वाशिम.
८. ग्रामपंचायत कार्यालय- मौजे भापूर/ हिवरपेन ता. रिसोड, जि. वाशिम

श्री सुशिलकुमार राठोड, उपप्रादेशिक अधिकारी, अमरावती-२ यांनी प्रकल्प समन्वयक यांना रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी एनव्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा. लि., नागपूर यांनी रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्री सुशिलकुमार राठोड, उपप्रादेशिक अधिकारी अमरावती-२ यांनी सांगीतले की, सदर रेती घाटांच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

मा. अध्यक्ष यांनी स्वत: रेतीघाटाबाबत प्रश्न विचारला की, रेती रेतीघाटापासून वाहतुक करणेकरीता ट्रॅक्टरनेच रेती वाहून नेणे आवश्यक आहे का. याबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी, वाशिम यांनी माहिती दिली की, रेती घाटापासून रेती डेपोपर्यंत रेती वाहून नेण्याकरीता केवळ ट्रॅक्टरनेच वाहतुकीची परवानगी देण्यात आलेली आहे. तथापी, रेती डेपो पासून पूढील वाहतुक ट्रक अथवा इतर वाहनांमार्फत केल्या जाऊ शकते.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांना काही प्रश्न अथवा सुचना असल्यास मांडण्याबाबत सुचित केले. मात्र उपस्थितांपैकी कोणीही प्रश्न उपस्थित केला नाही.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (सुशिलकुमार राठोड ) | ( सं. दे. पाटील ) | ( राजेंद्र जाधव ) |
| समन्वयक | सदस्य | अध्यक्ष, लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप- प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी |
| म.प्र.नि.मंडळ, अमरावती-२ | म.प्र.नि.मंडळ, अमरावती | वाशिम |